कार्यकारी सारांश

कार्यकारी सारांश

या अहवालाविषयी

वर्ष 2023-24 या वर्षाकरिता राज्याच्या वित्तव्यवस्थेवर भारताचे नियंत्रक आणि महालेखाकार यांचा हा अहवाल आहे. हा अहवाल राज्याच्या आर्थिक, अर्थसंकल्पीय व्यवस्थापन आणि लेख्यांची गुणवत्ता, वित्तीय प्रतिवेदन पद्धती आणि राज्य वित्तव्यवस्था संबंधित इतर बाबींचा आढावा सादर करतो.

हा कार्यकारी सारांश या अहवालातील मजकुरावर प्रकाश टाकतो आणि महत्वाच्या आकडेवारी आणि पैलूंच्या संक्षिप्त चित्रणाद्वारे वित्तीय स्थिरता, अर्थसंकल्पाच्या हेतूच्या तुलनेत कामगिरी, महसूल आणि खर्च यांचे प्रक्षेपण, तफावतीची कारणे आणि त्याचे परिणाम याबद्दलचे अंतरंग स्पष्ट करतो.

स्थूल राज्य उत्पन्न

स्थूल राज्य उत्पन्न (प्रचलित किंमतीनुसार) 11.08 *टक्क्यांच्या* चक्रवाढ वार्षिक विकास दराने 2019-20 मधील ₹ 26,56,806 कोटींवरून वाढून 2023-24 मध्ये ₹ 40,44,251 कोटींवर पोहोचले आहे. 2022-23 च्या तुलनेत स्थूल राज्य उत्पादनात 10.93 *टक्के* वाढ झाली आहे. 2023-24 मध्ये राज्याची महसुली जमा (₹ 4,30,596.46 कोटी) आणि महसुली खर्च (₹ 4,44,350.46 कोटी) अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अनुक्रमे 4.21 *टक्के* आणि 4.57 *टक्क्यांनी* कमी होते. त्याचप्रमाणे भांडवली खर्चही अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा 5.20 *टक्क्यांनी* कमी होता.

महसुली जमा 6.14 *टक्क्यांनी* वाढली असून महसुली जमेचे 2022-23 मधील स्थूल राज्य उत्पन्नाशी गुणोत्तर 11.13 *टक्क्यांवरून* 2023-24 मध्ये 10.65 *टक्क्यांपर्यंत* घसरले. या कालावधीत कर महसुलात 10.73 *टक्के* आणि राज्याच्या स्वत:च्या कर महसुलात 8.96 *टक्क्यांनी* वाढ झाली आहे.

जमा-खर्चातील तफावत

जमा आणि खर्च यांच्यातील तफावतीचे सातत्य वाढत्या वित्तीय ताणाचे द्योतक आहे. राज्याचा स्वतःचा कर महसूल, करेतर महसूल, करातील राज्यांच्या हिश्श्याचे हस्तांतरण, केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदान आणि ऋणेतर भांडवली जमा असे जमेचे वेगवेगळे स्त्रोत राज्याकडे आहेत. राज्य शासनाच्या खर्चात महसुली लेख्यांवरील खर्च तसेच भांडवली खर्चाचा (मालमत्ता निर्मिती, कर्जे व अग्रिमे, गुंतवणूक इ.) समावेश होतो. 2019-20 ते 2023-24 या कालावधीत महसुली जमा 2019-20 मधील ₹ 2,83,189.58 कोटींवरून 52.05 *टक्क्यांनी* वाढून 2023-24 मध्ये 11.04 *टक्के* चक्रवाढ वार्षिक विकास दराने ₹ 4,30,596.46 कोटी झाली आहे. 2022-23 च्या तुलनेत 2023-24 मध्ये स्वत:च्या कर महसुलात ₹ 24,857.06 कोटी (8.96 *टक्के*), करेतर महसुलात ₹ 4,081.53 कोटी (24.33 *टक्के*) आणि केंद्रीय कर आणि शुल्कांमध्ये राज्याचा हिस्सा ₹ 11,348.78 कोटी (18.91 *टक्के*) वाढला आहे तर केंद्र शासनाकडून मिळणारे अनुदान ₹ 15,368.84 कोटींनी

(29.89 *टक्के*) कमी झाले. 2023-24 मध्ये महसुली जमेचा महत्त्वपूर्ण भाग (75.06 *टक्के*) राज्याच्या स्वतःच्या स्त्रोतांमधून आला, तर केंद्रीय कर हस्तांतरण आणि सहाय्यक अनुदानांनी एकत्रितपणे 24.94 *टक्के* योगदान दिले.

सेवांचा विद्यमान दर्जा राखण्यासाठी आणि मागील दायित्वांच्या प्रदानांसाठी महसुली खर्च केला जातो. अर्थात, त्यामुळे राज्याच्या पायाभूत सुविधा आणि सेवांच्या वितरणात कोणताही भर पडत नसते. 2019-20 ते 2023-24 या कालावधीत महसुली खर्च ₹ 3,00,305.21 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 11.30 *टक्के*) वरून वाढून ₹ 4,44,350.46 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 10.99 *टक्के*) झाला आहे.

साधनांच्या मर्यादेपलीकडे केलेल्या खर्चाचा परिणाम

महसुली जमा आणि महसुली खर्च यातील ऋण तफावतीमुळे महसुली तूट निर्माण होते. राज्याची महसुली तूट 2022-23 मधील ₹ 1,936.47 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 0.05 *टक्के*) वरून चालू वर्षात ₹ 13,754 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 0.34 *टक्के*) झाली आहे. राज्य शासनाने भांडवली खर्चावर ₹ 72,573.40 कोटी खर्च केले. 2023-24 मध्ये हा खर्च एकूण खर्चाच्या 13.91 *टक्के* (₹ 5,21,898.02 कोटी) होता. 2023-24 मध्ये घेतलेल्या एकूण कर्जापैकी भांडवली खर्च 57.68 *टक्के* होता. अशा प्रकारे, वर्षभरात कर्ज घेतलेल्या निधीचा काही भाग विद्यमान खर्चासाठी आणि पूर्वीच्या कर्जांची परतफेड करण्यासाठी वापरला गेला.

राज्याचा एकूण खर्च आणि एकूण ऋणेतर जमा यांच्यातील तफावतीमुळे राजकोषीय तूट निर्माण होते. राज्याची राजकोषीय तूट 2019-20 मधील ₹ 53,886.19 कोटी वरून वाढून (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 2.03 *टक्के*) 2023-24 मध्ये ₹ 90,559.36 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 2.24 *टक्के*) झाली आहे.

महसुली खर्चांतर्गत वचनबद्ध खर्चाच्या प्रमाणाचा सर्वात मोठा वाटा आहे. वचनबद्ध खर्चाचा संसाधनांवर पहिला भार असतो आणि त्यात वेतन आणि मजुरी, निवृत्तीवेतन आणि व्याज प्रदानांवरील खर्चाचा समावेश असतो वेतन आणि मजुरी, निवृत्तीवेतन आणि व्याज प्रदानांवरील वचनबद्ध खर्च 2023-24 मध्ये महसुली खर्चाच्या 53.40 *टक्के* होता, जो 2022-23 च्या तुलनेत 7.05 *टक्के* (₹ 15,620.86 कोटी) अधिक आहे.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत वचनबद्ध खर्चाव्यतिरिक्त अपरिवर्तनीय खर्च महसुली खर्चाच्या 15.10 *टक्क्यांवरून* 8.98 *टक्क्यांवर* आला आहे. 2022-23 मध्ये ₹ 45,353.83 कोटींवरून 2023-24 मध्ये 3.57 *टक्क्यांनी* घटून ₹ 39,883.14 कोटींवर आला. महसुली खर्चाच्या टक्केवारीनुसार अनिवार्य आणि अपरिवर्तनीय खर्च एकत्रितपणे घेतल्यास 2019-20 मधील 72.25 *टक्क्यांवरून* घटून (₹ 2,16,973.32 कोटी) 2023-24 मध्ये 62.38 *टक्के* (₹ 2,77,178 कोटी)

झाला आहे. अनिवार्य आणि अपरिवर्तनीय खर्चाच्या घसरणीच्या प्रवृत्तीमुळे शासनाला इतर प्राधान्य क्षेत्रे आणि भांडवल निर्मितीसाठी अधिक परिवर्तनशीलता येते.

वचनबद्ध नसलेल्या खर्चाचा मोठा भाग म्हणजे अर्थसहाय्य आहे

वचनबद्ध नसलेल्या खर्चात अर्थसहाय्याचा वाढीचा कल होता, जो 2019-20 मधील ₹ 28,385.98 कोटींवरून वाढून 2023-24 मध्ये ₹ 48,053.50 कोटी झाला म्हणजेच 2019-20 मधील महसुली खर्चाच्या 9.45 *टक्क्यांवरून* वाढून 2023-24 दरम्यान 10.81 *टक्के* असा वाढला.

एकल नोडल अभिकरणांना निधी

केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणी आणि निधी प्रवाहासाठी एकल नोडल अभिकरण प्रणाली सुरू केली आहे केंद्र शासन आणि राज्य शासनाचा हिस्सा शासकीय लेख्याबाहेर असलेल्या एकल नोडल अभिकरणांच्या बँक खात्यात हस्तांतरित केला जातो.

सार्वजनिक वित्त व्यवस्थापन प्रणालीच्या पोर्टलवर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, या वर्षात, ₹ 15,568.58 कोटी केंद्रीय हिस्सा म्हणून राज्य शासनास प्राप्त झाला होता. शासनाने, 31 मार्च 2024 पर्यंत एकल नोडल अभिकरणांकडे केंद्र शासनाचा ₹ 13,169.82 कोटींचा हिस्सा आणि राज्य शासनाचा ₹ 18,007.73 कोटींचा हिस्सा हस्तांतरित केला. सहाय्यक अनुदानांच्या देयकांद्वारे एकूण ₹ 31,177.55 कोटी हस्तांतरित करण्यात आले. सार्वजनिक वित्त व्यवस्थापन प्रणालीच्या अहवालानुसार, 31 मार्च 2024 पर्यंत ₹ 15,937.39 कोटी एकल नोडल अभिकरणांच्या बँक खात्यांमध्ये अखर्चित पडून होते.

अर्थसंकल्प बाहय कर्जे

राज्य शासनाने सार्वजनिक उपक्रमामार्फत ₹ 10,135 कोटी अर्थसंकल्पबाहय कर्ज म्हणून उभे केले, जे राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाले नाही, परंतु अर्थसंकल्पाद्वारे परतफेड करणे व उपयोगात आणणे आवश्यक आहे. त्यापैकी ₹ 2,500 कोटी 2022-23 मध्ये उभे करण्यात आले. वर्षभरात राज्य शासनाने अर्थसंकल्पबाहय कर्जापोटी ₹ 65 कोटींचे मुद्दल भरले.

हमींच्या कारणास्तव आकस्मिक दायित्वे

शासनाने विविध महामंडळे आणि इतरांनी घेतलेल्या कर्जाची हमी दिली होती, जी 2023-24 अखेर ₹ 85,896.94 कोटी (मुद्दल: ₹ 79,243.90 कोटी; व्याज: ₹ 6,653.04 कोटी) होती. विधिमंडळात सादर करण्यात आलेल्या हमी विवरणपत्रानुसार 2023-24 मध्ये ₹ 23,115.81 कोटींची हमी राज्य शासनाने दिली होती. वर्ष 2023-24 मध्ये काहीही रक्कम परतफेड केली गेली नाही.

राजकोषीय शाश्वतता

तूट, ऋण आणि दायित्वांचा स्तर, अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे, हमी, अर्थसहाय्य यांस्तव बांधिलकी इत्यादी सारख्या स्थूल-राजकोषीय निकषांच्या अनुसार राजकोषीय शाश्वततेची तपासणी केली जाते. महसूल आणि खर्चातील तफावतीचा विचार केला तर एक महत्त्वाचा अडथळा म्हणजे वचनबद्ध आणि अपरिवर्तनीय खर्च, ज्यात वेतन आणि मजुरी, निवृत्तीवेतन प्रदाने, व्याज इत्यादी आणि शिवाय अपरिवर्तनीय खर्च जसे की केंद्र पुरस्कृत योजनांसाठी वचनबद्धता, राखीव निधीत हस्तांतरण, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हस्तांतरण इत्यादींचा समावेश आहे.

राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन आवश्यकता आणि राजकोषीय मापदंडांचे अनुपालन

राज्य शासनाने महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम 2005 लागू केला असून वित्तीय व्यवस्थापनात आंतरपिढीगत समता आणि दीर्घकालीन स्थूल आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्याच्या उद्देशाने त्यात वेळोवेळी सुधारणा केल्या आहेत. महसुली तूट उत्तरोत्तर दूर करणे, राजकोषीय तूट कमी करणे आणि राजकोषीय शाश्वततेशी सुसंगत विवेकी कर्ज व्यवस्थापन असे या अधिनियमाचे उद्दीष्ट आहे.

राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन *टक्क्यांपेक्षा* कमी ठेवून राजकोषीय तूट आटोक्यात आणणे आणि 2011-12 नंतर महसुली आधिक्य कायम ठेवणे ही राज्याची प्रमुख राजकोषीय उद्दिष्टे होती. मात्र, त्यानंतरच्या काळात आणखी सुधारणा करून 2013-14 ते 2021-22 या कालावधीत '2011-12 नंतरचे महसूल आधिक्य' हे कलम शिथिल करण्यात आले.

कोविड-19 महामारीमुळे राज्याच्या संसाधनांवर विपरीत परिणाम झाला होता. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त संसाधने उभी करण्यासाठी केंद्र शासनाने 2020-21 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या दोन *टक्के*, 2021- 22 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या एक *टक्का* आणि 2022-23 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या 0.5 *टक्के* अतिरिक्त कर्ज मर्यादेला परवानगी दिली होती. त्यानुसार महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा 2020 मधील सुधारणेनुसार 2020-21 आणि 2021-22 साठी राजकोषीय तुटीचे उद्दिष्ट स्थूल राज्य उत्पन्नाच्या चार *टक्के* आणि 2022-23 साठी स्थूल राज्य उत्पन्नाच्या 3.5 *टक्के* होते. 2023-24 या आर्थिक वर्षासाठी राजकोषीय तुटीचे उद्दिष्ट स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन *टक्के* होते.

2019-20 ते 2023-24 या पाच वर्षांच्या कालावधीत राज्याला एकाही वर्षात महसुली आधिक्य गाठता आलेले नाही. 2022-23 मधील ₹ 1,936.47 कोटींची महसुली तूट 2023-24 मध्ये वाढून ₹ 13,754 कोटी झाली. उद्दीष्टित राजकोषीय तूट तीन टक्क्यांच्या आत आटोक्यात आणण्यात राज्याला यश आले.

ऋण शाश्वतता

2019-20 ते 2023-24 या कालावधीत स्थूल राज्य उत्पन्नाच्या *टक्के*वारीनुसार ऋणात आंतरवार्षिक फरक दिसून आला. 2020-21 वगळता हे प्रमाण 17.42 *टक्के* ते 18.46 *टक्क्यां*दरम्यान होते, जेव्हा कोविड-19 महामारीमुळे ते वाढून 20.54 *टक्के* झाले. या पाचही वर्षांत स्थूल राज्य उत्पन्नाच्या *टक्के*वारीनुसार ऋण हे पंधराव्या वित्त आयोगाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टांच्या आत होते. शिवाय, राज्याची वित्तीय तूट पाचही वर्षांत स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन *टक्क्यां*च्या उद्दिष्टाच्या आत होती आणि थकित ऋणाच्या (व्याजासह) परतफेडीसाठी 54.05 *टक्के* ते 67.96 *टक्क्यां*पर्यंतच्या कर्जाचा वापर करण्यात आला. तथापि, हे लक्षात घेतले पाहिजे की स्थूल राज्य उत्पन्नाच्या *टक्के*वारीनुसार ऋण 2022-23 मध्ये 17.42 वरून 2023-24 मध्ये 18.11 पर्यंत वाढले आहे. याशिवाय 2022-23 आणि 2023-24 दरम्यान अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली कर्जे घेण्यात आली. अशा प्रकारे, जर सध्याचा कल पाळला गेला तर शेवटी ऋण /स्थूल राज्य उत्पन्नाच्या गुणोत्तराचे प्रमाण वाढेल ज्यामुळे वित्तीय लवचिकता कमी होईल.

प्राथमिक शिल्लक (प्राथमिक तूट (-)/अधिशेष (+)) पाचही वर्षांत नकारात्मक होती. 2021-22 ते 2023-24 दरम्यान प्राथमिक तुटीचा वाढता कल दिसून आला आहे. 2023-24 मध्ये प्राथमिक तूट ₹ 44,907.45 कोटी होती, ज्यावरून प्राथमिक खर्चही कर्जाच्या निधीतून भागवावा लागल्याचे दिसून आले. यावरून शासनाचा महसुली प्रवाह स्थिर नसल्याने ऋण शाश्वतता अवघड झाल्याचे दिसून आले.

अर्थसंकल्पीय कामगिरी

एकूण अर्थसंकल्पीय निष्पत्ती

एकूण अर्थसंकल्पीय निष्पत्ती/प्रत्यक्ष खर्च हा किती प्रमाणात मूळ मंजूर रक्कम मंजुरीपेक्षा कमी तसेच मंजुरीपेक्षा अधिक या स्वरुपात प्रतिबिंबित करतो याचे मोजमाप एकूण अर्थसंकल्पीय निष्पत्ती करते.

महसूल विभागात मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत खर्चातील विचलन 4.90 *टक्के* होते. हे 110 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के* दरम्यान, 45 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के* दरम्यान, 30 अनुदानांमध्ये ±50 *टक्के* ते 100 *टक्के* दरम्यान आणि 43 अनुदानांमध्ये 100 *टक्क्यांच्या* बरोबरीने किंवा त्यापेक्षा अधिक विचलन झाल्याने होते.

भांडवली विभागात मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत खर्चातील विचलन 10.47 *टक्के* होते. हे 67 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के* दरम्यान, 19 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के* दरम्यान, 18 अनुदानांमध्ये ±50 *टक्के* ते 100 *टक्के* दरम्यान आणि 20 अनुदानांमध्ये 100 *टक्क्यांइतके* किंवा त्याहून अधिक विचलन झाल्याने होते.

खर्चाच्या रचनेतील निष्पती

खर्च रचना निष्पत्ति हे अंमलबजावणी दरम्यान मुख्य अर्थसंकल्प श्रेणींमधील पुनर्वाटपामुळे खर्चाच्या रचनेत झालेल्या बदलाचे मोजमाप करते.

महसूल विभागात सुधारित अंदाजपत्रकाच्या तुलनेत खर्चामध्ये 1.56 *टक्के* विचलन होते. हे 175 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के*, 11 अनुदानांमध्ये ±25 *टक्के* ते ±50 *टक्के*, तीन अनुदानांमध्ये ± 50 *टक्के* ते 100 *टक्के* आणि सहा अनुदानांमध्ये 100 *टक्क्यां*इतके किंवा त्याहून अधिक विचलन झाल्याने होते.

भांडवली विभागात सुधारित अंदाजपत्रकाच्या तुलनेत खर्चामध्ये चार *टक्के* विचलन होते. हे 108 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के*, सहा अनुदानांमध्ये ±25 *टक्के* ते ±50 *टक्के*, 20 अनुदानांमध्ये ± 50 *टक्के* ते 100 *टक्के* आणि दोन अनुदानांमध्ये 100 *टक्क्यांच्या* बरोबरीने किंवा त्याहून अधिक विचलन झाल्याने होते.

या अनुदानातील ₹ 1,64,204.75 कोटींचा प्रत्यक्ष खर्च मूळ तरतुदीपर्यंतही (₹ 2,02,942.45 कोटी) पोहोचला नसल्याने वर्षभरात 44 दत्तमत अनुदानांमध्ये (प्रत्येक प्रकरणात ₹ 10 कोटी किंवा त्याहून अधिक) प्राप्त झालेल्या एकूण ₹ 29,563.05 कोटींच्या पुरवणी तरतुदी अनावश्यक ठरल्या.

अनुदाने/विनियोजने यातील जादा रकमांचे नियमितीकरण

भारतीय राज्यघटनेच्या कलम 205 नुसार नियमितीकरणाची आवश्यकता असलेल्या 13 दत्तमत अनुदानांमध्ये आणि दोन भारित विनियोगांमध्ये ₹ 35.58 *कोटींचा* अतिरिक्त खर्च झाला. शिवाय, मार्च 2024 अखेरीस 2017-18 ते 2022-23 या वर्षांसाठी 48 अनुदाने व 17 विनियोगांचा ₹ 2,990.18 कोटींचा अतिरिक्त खर्च नियमितीकरणासाठी प्रलंबित होता.

लेख्यांमध्ये चुकीचे वर्गीकरण

असे निदर्शनास आले की ₹ 3,544.73 कोटींच्या रकमा महसूल विभागाऐवजी भांडवली विभागात चुकीच्या अर्थसंकल्पित करून लेखांकित केल्या.

एकंदरीत, अर्थसंकल्पाच्या विश्वासार्हतेचे मूल्यमापन असे दर्शविते की, प्रत्यक्ष खर्च आणि मूळ अंदाजपत्रक तसेच प्रत्यक्ष खर्च आणि अंतिम अंदाजपत्रक यांच्यातील तफावत पाच टक्क्यांपेक्षा जास्त होती आणि विविध अनुदानांमध्ये 25 टक्क्यांपेक्षा जास्त विचलन होते. शिवाय, अनेक प्रकरणांमध्ये पुरवणी अनुदान असून, मूळ अनुदानाइतकाही खर्च होत नसल्याचे निदर्शनास आले. अशा विचलनांना सामोरे जाण्यासाठी विश्वासार्ह अर्थसंकल्प प्रक्रियेची आवश्यकता आहे

लेख्यांची गुणवत्ता आणि वित्तीय प्रतिवेदन

लेख्यांची गुणवत्ता आणि वित्तीय प्रतिवेदनात अनुपालनातील त्रुटी, नियमिततेमधील कमकुवतपणा आणि वास्तविक खर्चाचा पुरावा देणाऱ्या लेखा नोंदी किंवा समायोजन नोंदी प्राप्त होण्यास उशीर

होण्याशी संबंधित मुद्दे, व्यवहार आणि घटना यांचा समावेश आहे. लेख्यांचा अपूर्ण ताळमेळ, भारतीय शासकीय लेखांकन मानकांच्या तरतुदींचे पालन न करणे, उपयोगिता प्रमाणपत्रे, तपशीलवार आकस्मिक देयके आणि वार्षिक लेखे सादर न करणे, व्याज दायित्वांची पूर्तता न करणे यांसारख्या लेखे आणि वित्तीय प्रतिवेदनाशी संबंधित मुद्द्यांवरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

ताळमेळ

महाराष्ट्र कोषागार नियमावलीनुसार सर्व विभागांनी आपले खर्च व जमा यांची प्रधान महालेखाकार (लेखा व अनुदान) कार्यालयातील लेख्यांमध्ये नोंद केलेल्या खर्चाशी ताळमेळ घेणे आवश्यक आहे. राज्य शासनाने 2023-24 मध्ये ₹ 2,63,912.57 कोटी (एकूण महसुली जमेच्या 98 *टक्के*) महसुली जमा आणि ₹ 3,64,728.27 कोटी (एकूण महसुली खर्चाच्या 89 *टक्के*) महसुली खर्च आणि ₹ 56,891.88 कोटी (एकूण भांडवली खर्चाच्या 82.61 *टक्के*) भांडवली खर्च यांचा ताळमेळ घेतला. राज्य शासनाने दिलेल्या फक्त ₹ 4,635.18 कोटींच्या (राज्य शासनाने दिलेल्या एकूण कर्जे व अग्रिमांच्या 94.51 *टक्के*) कर्जे व अग्रिमांचा ताळमेळ घेण्यात आला.

वैयक्तिक ठेव लेख्यांचे कार्यान्वयन

वैयक्तिक ठेव लेखे असलेल्या संबंधित प्रशासकांनी कोषागार ताळमेळ घेण्याच्या आवश्यकतेनुसार वैयक्तिक ठेव लेख्यांच्या केवळ 268 प्रशासकांनी (1,248 पैकी) त्यांच्या शिल्लकीशी ताळमेळ घेतला आणि पडताळणी केली. तसेच, 31 मार्च 2024 रोजी ₹ 88.21 कोटी शिल्लक असलेल्या 128 वैयक्तिक ठेवी प्रशासकाच्या लेख्यांमधील रकमा एक वर्षांपेक्षा जास्त काळ निष्क्रिय पडून होत्या.

सशर्त अनुदानाच्या बदल्यात उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यातील विलंब

राज्य शासनाच्या 32 विभागांना देण्यात आलेल्या सशर्त अनुदानाशी संबंधित ₹ 36,756.09 कोटींची 10,793 उपयोगिता प्रमाणपत्रे 31 मार्च 2024 रोजी प्रलंबित होती, जी राज्याच्या एकूण खर्चाच्या 6.53 *टक्के* (₹ 5,62,714.85 कोटी) होती. विहित कालावधीच्या उपरांत प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे अनुदानाचा विनियोग अभिप्रेत हेतूसाठी झाला होता याची खात्री देण्यातील अभाव दर्शवितात आणि लेख्यांमध्ये दाखविलेला खर्च त्या प्रमाणात अंतिम करता येत नाही.

संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या बदल्यात तपशीलवार आकस्मिक देयके

संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या माध्यमातून काढलेल्या अग्रिम रकमांच्या बदल्यात तपशीलवार आकस्मिक देयके सादर करण्याची आवश्यकता असून देखील मार्च 2024 अखेरीस ₹ 3,674.60 कोटींच्या 1,438 संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या बदल्यात तपशीलवार आकस्मिक देयके सादर करण्यात प्रलंबित होती. तपशीलवार आकस्मिक देयके सादर न करणे हे विभागाच्या तसेच कोषागारांच्या संनियंत्रणाचा अभाव दर्शविते.

प्रचलित नियम आणि संहितांच्या तरतुदींचे अनुपालन हे लेखे आणि वित्तीय प्रतिवेदनातील नियंत्रण आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी अभिप्रेत आहे. अनुपालन न केल्याने आणि विचलनामुळे लेखे आणि वित्तीय प्रतिवेदनेच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. सशर्त अनुदानाच्या बदल्यात उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेवर सादर न करणे, संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या बदल्यात तपशीलवार आकस्मिक देयके सादर न करणे, वैयक्तिक ठेव लेख्यांमध्ये निधी ठेवल्याने लेख्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम झाला.